# मिरा भाईंदर महानगरपालिका

## माहिती व जनसंपर्क विभाग

## प्रेसनोट

❖ **प्रारूप मतदार यादीतील हरकतींची तपासणी करण्यासाठी मा. आयुक्तांची स्थळ भेट**

प्रारूप मतदार यादीच्या संदर्भात प्राप्त झालेल्या हरकती आणि सूचनांची सखोल पडताळणी करण्याच्या उद्देशाने मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से.) यांनी इंद्रलोक फेस 6 आणि हटकेश परिसरातील विविध इमारतींना प्रत्यक्ष भेट दिली. यावेळी त्यांनी संबंधित हरकतदार तसेच नागरिकांची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांची माहिती तपासली. यावेळी, अतिरिक्त आयुक्त प्रियंका राजपूत, उपायुक्त (मुख्यालय) डॉ. सचिन बांगर, उपायुक्त कविता बोरकर, नगरसचिव दिनेश कानगुडे, सहाय्यक आयुक्त आणि महापालिका कर्मचारी उपस्थित होते.

स्थळीच मतदार नोंदींची पाहणी करून, प्रत्येक मतदाराची नोंद त्यांच्या वास्त व प्रभागानुसार अचूक असणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे मा. आयुक्त यांनी नमूद केले. पडताळणीदरम्यान आढळणाऱ्या विसंगती तातडीने सुधारून मतदार  यादी तयार करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

महानगरपालिका प्रशासन नागरिकांना आवाहन करते की प्रारूप मतदार यादीतील आपली माहिती नीट तपासावी व काही हरकत किंवा सूचना असल्यास दिनांक ३ डिसेंबर 2025 पर्यंत मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्यालय, पहिला मजला, कर विभाग, स्व.इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,भाईंदर ( पश्चिम) येथे दाखल  करावी. नागरिकांनी आपली मतदार नोंद ही निवडणूक प्रक्रियेचा अत्यंत महत्त्वाचा भाग समजून, अचूक मतदार यादी तयार करण्यात सहकार्यपूर्ण सहभाग घ्यावा. तसेच महापालिकेच्या मुख्य कार्यालयात आणि प्रभाग कार्यालयांमध्ये उपलब्ध असलेल्या मतदार सहाय्यता केंद्रांद्वारे नागरिकांना संपूर्ण मार्गदर्शन मिळेल असे मा. आयुक्त यांनी सांगितले.